**ठळक बातम्या**

- कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर,/ दोन्ही देशात महत्त्वपूर्ण विषयांवर द्विपक्षीय चर्चा होणार

- मुख्य निवडणूक आयुक्तपदी ज्ञानेश कुमार यांची नेमणूक

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई विरुद्धच्या उपान्त्य सामन्यात विदर्भाचा पहिल्या डावात ३८३ धावांचा डोंगर

**आणि**

- वादग्रस्त टिप्पणी प्रकरणी रणवीर अलाहबादीयाला अटकेपासून संरक्षण

**<><><><><>**

कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी भारत दौऱ्यावर असून आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यांच्याशी महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करत आहेत. शेख तमीम यांचं काल रात्री नवी दिल्ली विमानतळावर आगमन झालं त्यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी त्यांचं स्वागत केलं. शेख तमीम यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन चर्चा केली. राष्ट्रपती भवनात पाहुण्याना पारंपरिक मानवंदना देण्यात आली.

शेख तमीम यांच्यासोबत उच्चपदस्थ शिष्टमंडळ आलं असून व्यापार, गुंतवणूक, उर्जा, आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्याबद्दल या दौऱ्यात ते चर्चा करणार आहेत. कतार बरोबर भारताचे दृढ आर्थिक संबंध आहेत. अनेक कतारी कंपन्यांनी भारतात तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, विमानतळ, बंदरं अशा विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि कतार दरम्यान सहकार्याला प्रचंड वाव असून ते वृद्धिंगत करण्याचा उभय राष्ट्रांचा निर्धार असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी सांगितलं. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजतर्फे आयोजित भारत कतार संयुक्त व्यापार मंचाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

**होल्ड - बाईट - पीयुष गोयल....**

कतारचे वाणिज्यमंत्री शेख फैज़ल बिन थानी अल थानी देखील कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या वेळी भारत – कतार दरम्यान दोन समझोता करार झाले.

**<><><><><>**

देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी निवडणूक आयोगाचे सध्याचे सदस्य ज्ञानेश कुमार यांची नेमणूक झाल्याचं केंद्रीय विधी मंत्रालयाने जाहीर केलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्तपदाच्या नेमणुकीविषयीचा नवा कायदा लागू झाल्यानंतरची ही पहिलीच नेमणूक आहे. नवीन कायद्यानुसार नियुक्ती समितीची बैठक काल नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी बैठकीला उपस्थित होते. निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीविषयी सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेचा निकाल लागेपर्यंत नवीन आयुक्तांची नेमणूक लांबणीवर टाकावी अशी मागणी राहुल गांधी यांनी बैठकीत मांडली. ज्ञानेश कुमार भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८८च्या तुकडीतले केरळ कॅडरचे अधिकारी असून त्यांच्याकडे केरळ राज्यशासन तसंच संरक्षण, संसदीय कार्य, आणि सहकार मंत्रालयात काम करण्याचा अनुभव आहे. देशाचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ते उद्या

कार्यभार स्वीकारतील. ज्ञानेश कुमार यांचा कार्यकाळ २६ जानेवारी २०२९ पर्यंत असून लोकसभेच्या पुढच्या निवडणुकांचा कार्यक्रम त्यांच्या कारकिर्दीत निश्चित होईल असा अंदाज आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार आज सेवा निवृत्त होत आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या जागी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी विवेक जोशी यांची नेमणूक झाली आहे. ते भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८९च्या तुकडीतले हरयाणा केडरचे अधिकारी आहेत. त्यांचा कार्यकाळ २०३१ पर्यंत असेल. आयोगाचे तिसरे सदस्य म्हणून केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे माजी अध्यक्ष सुशील चंद्रा यांची यापूर्वीच नेमणूक झाली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक घाईघाईने करण्यात आल्याची टीका काँग्रेसने केली आहे.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जम्मू काश्मीरमधे नव्या फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यावेळी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि नायब राज्यपाल मनोज सिन्हा उपस्थित होते. त्यांच्याशिवाय इतर उच्चपदस्थ अधिकारीही यावेळी उपस्थित होते. शहा यांनी याआधी उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, मध्य प्रदेश आणि गुजरातमधे फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला होता.

<><><><><>

भारतात संरक्षण क्षेत्राशी संबंधित उद्योग मोठ्या विस्ताराच्या उंबरठ्यावर असल्याचं प्रतिपादन संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी काल केलं. नवी दिल्लीत झालेल्या संरक्षण परिषदेत ते बोलत होते. सैन्य हे तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि युद्धासाठी सज्ज राहावं, तसंच, या सैन्याला आधुनिक पद्धतीच्या युद्धातली गुंतागुंत प्रभावीपणे हाताळता यावी, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचंही सिंह

यावेळी म्हणाले. मात्र, देशाला युद्धासाठी उपयुक्त असलेल्या प्रगत उत्पादनांचं केंद्र बनवण्यासाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रात भागीदारी गरजेची असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं.

<><><><><>

२०२४-२५ या आर्थिक वर्षात त्या आधीच्या वर्षीच्या तुलनेत भारताच्या निर्यातीत ७ पूर्णांक २१ शतांश टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे, तर आयातीत एप्रिल ते जानेवारी या कालावधीत ८ पूर्णांक ९६शतांश टक्के वाढ नोंदवली गेली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने काल जाहीर केलेल्या आकडेवारीत ही माहिती देण्यात आली. या कालावधीत एकंदर निर्यात सुमारे ६८३ अब्ज अमेरिकन डॉलर्स झाली आहे तर आयात एकंदर ७७० अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते जानेवारी दरम्यान व्यापारी मालाची निर्यात ३५९ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती तर याच कालावधीत आयात एकंदर ६०२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती. या कालावधीत व्यापारी मालाची तूट सुमारे २४३ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती, मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय नागरी भूस्थानिक आधारित जमीन सर्वेक्षण अर्थात ‘नक्शा’ या उपक्रमाचं उद्घाटन आज केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते होणार आहे. याअंतर्गत २६ राज्यांमधल्या नागरी भागात भूसर्वेक्षण केलं जाणार आहे. शहरी भागात जमिनीच्या मालकीचे अचूक आणि विश्वासार्ह तपशील तयार व्हावेत यासाठी जमीन नोंदणी करणं आणि माहिती अद्ययावत करण्याचं काम केलं जाईल. माहिती तंत्रज्ञानावर आधारित या यंत्रणेमुळे पारदर्शकता, कार्यक्षमता वाढेल आणि शाश्वत विकासालाही त्याचा हातभार लागेल असं ग्रामविकास मंत्रालयानं नमूद केलं आहे. महाराष्ट्रातल्या १० स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे सर्वेक्षण होणार

असून, त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड, तसंच बुलडाणा नगर परिषद क्षेत्राचा समावेश आहे.

**<><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत नागपूरमधे सुरू असलेल्या उपान्त्य सामन्यात विदर्भानं पहिल्या डावात मुंबईसमोर ३८३ धावांचा डोंगर उभारला आहे. काल नाणेफेक जिंकून विदर्भाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिवसअखेर त्यांच्या ५ बाद ३०८ धावा झाल्या होत्या. मुंबईचा डाव सुरु झाला असून शेवटची बातमी मिळाली तेव्हा त्यांच्या १ गडी बाद २८ धावा झाल्या होत्या.  अहमदाबाद मधे दुसरा उपांत्य सामना केरळ आणि गुजरात दरम्यान सुरू असून, केरळने काल पहिल्या दिवसअखेर ४ बाद २०६ धावा केल्या. आज दुसऱ्या दिवशी, शेवटचं वृत्त मिळालं तेव्हा त्यांच्या ५ बाद ३१६ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

BCCI, अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आगामी चॅम्पियन्स करंडक २०२५ साठी भारतीय पुरुष संघाच्या जर्सीचं अनावरण केलं आहे. BCCI नं समाज माध्यमांवरील एका पोस्टमध्ये भारतीय खेळाडूंची जर्सी प्रदर्शित करतानाची छायाचित्रं सामायिक केली आहेत. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघ दोन्ही खांद्यावर तिरंगा आणि उजव्या बाजूला चॅम्पियन्स ट्रॉफीचा लोगो असलेल्या निळ्या जर्सीमध्ये दिसेल. भारतीय क्रिकेट संघ परवा दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर बांगलादेशविरुद्ध पहिला सामना खेळेल.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंग यांच्या खंडपीठाने यूट्युबर रणवीर अलाहबादीयाला वादग्रस्त टिप्पणी प्रकरणी आज झालेल्या सुनावणीत अटकेपासून संरक्षण दिलं आहे. रणवीर विरोधात अनेक

पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हा दाखल झाला होता. त्या विरोधात रणवीरनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. रणवीरच्या टिपण्ण्यांवर सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले. तसंच त्याला आपलं पारपत्र पोलीस ठाण्यात जमा करण्याचे आणि न्यायालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय  देश न सोडण्याचे निर्देश खंडपिठानं दिले आहेत.

**<><><><><>**

पंजाबमधल्या फरीदकोट इथं खासगी बस नाल्यात पडून आज सकाळी झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. बंगळुरूमधे काल रात्री साडे अकरा वाजता भरधाव वेगात जाणाऱ्या कारने झाडाला धडक दिल्यामुळे कारमधे बसलेल्या दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

ओडिशामधे भुवनेश्वरमधल्या एका खाजगी विद्यापीठात नेपाळी विद्यार्थिनीच्या आत्महत्येप्रकरणी ओडिशा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून या संदर्भात विद्यापीठातल्या एका विद्यार्थ्याला अटक केली आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई पोलिसांनी गेल्या ३० वर्षांपासून भारतात बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशातल्या एका कुटुंबातील तीन सदस्यांना परवा अटक केली.

**//<><><><><>//**